# 'के. के. वाघ अभियांत्रिकी'ला पारितोषिक




**नाशिक** : नाशिकमधील एबीबीतर्फे अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना इंडस्ट्री ४.० व फॅक्ट्री डिजिटीलाईझेशन या संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी एबीबी डिजिटल एक्स्पो अंतर्गत हा उपक्रमात के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सलग चौथ्या वर्षी पारितोषिक पटकावले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटीचे डीन डॉ. संतोष नारायण खेडकर उपस्थित होते. के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी एबीबीचे उपाध्यक्ष दयानंद कुलकर्णी, मा. मनोज वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेत नाशिक व परिसरातील एकूण सहा अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील आठ संघांनी सहभाग नोंदवला. त्यात ४० विद्यार्थी सहभागी होते. महाविद्यालयातून दर्शन गवारले, गायत्री दुसे, सोनम उगले, आर्यन भानुसे आणि अल्तमस शेख यांची निवड करण्यात आली.